महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

क्र.साप्रवि/रवका/न.क्र.११/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
*मुंबई - ४०० ०१९.*

# प्रशासकीय परिपत्रक क्र. २१८ दिनांक ०६ / ०३ / २००९

विषय : लोकसभा सार्वत्रिक निवडणूका - २००९
भारत निवडणूक आयोगाच्या आचार संहितेचे पालन करण्याबाबत.

.....

भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांनी लोकसभा सार्वत्रिक निवडणूका - २००९ च्या अनुषंगाने संपूर्ण महाराष्ट्र राज्यात दिनांक ०२ मार्च २००९ ते दिनांक २८ मे २००९ पर्यंत (निवडणुकीची घोषणा केल्याच्या दिनांकापासून ते निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण होण्याच्या दिनांकापर्यंत) आचारसंहिता लागू केली आहे. या बाबतचे सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे वरील विषयावरील दिनांक ०२.०३.२००९ चे पत्र सोबत जोडत आहोत.

२. मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या सदर पत्रात नमूद केल्याप्रमाणे आचारसंहिता दिनांक ०२.०३.२००९ ते २८.०५.२००९ पर्यंतच्या कालावधीसाठी अंमलात राहील. सबब, सर्व संबंधीत अधिकाऱ्यांना कळविण्यात येते की, त्यांनी सदर पत्रात नमूद केल्याप्रमाणे आचारसंहितेच्या प्रस्तुत कालावधीमध्ये राज्यातील मतदार प्रभावित होतील असे कोणत्याही प्रकारचे धोरणात्मक निर्णय घेऊ नयेत व आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करावे.

३. सदर प्रशासकीय परिपत्रक www.mahadiscom.in या कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

सोबत : वरीलप्रमाणे.

(सु. य. पाटील)
*मुख्य महाव्यवस्थापक (क)*

प्रत :
महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे.

D:\O&M\F.N.११-Election.doc

# मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,

क्रमांक : सीईएल-१५०९/प्र.क्र २२८ /०९/३३
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक २ मार्च २००९

प्रति,

सर्व अप्पर मुख्य सचिव, प्रधान सचिव व सचिव,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी,

विषय : **लोकसभा सार्वत्रिक निवडणुका-२००९**
भारत निवडणूक आयोगाच्या आचार संहितेचे पालन करण्याबाबत.

महोदय,

भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांनी लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीची घोषणा केली आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्यातील सर्व ४८ मतदारसंघांतून लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुका तीन टप्प्यांमध्ये घेण्याबाबतचा निवडणूक कार्यक्रम जाहिर केला आहे. तसेच दिनांक २ मार्च, २००९ ते दिनांक २८ मे, २००९ पर्यंत (निवडणुकीची घोषणा केल्याच्या दिनांकापासून ते निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण होण्याच्या दिनांकापर्यंत) भारत निवडणूक आयोगाने संपूर्ण महाराष्ट्र राज्यात आचार संहिता लागू केली आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या सूचनांनुसार उमेदवार व राजकीय पक्षांसाठीची आचार संहिता संपूर्ण महाराष्ट्र राज्याकरिता दिनांक २ मार्च, २००९ पासून ते दिनांक २८ मे, २००९पर्यंतच्या कालावधीसाठी अंमलात राहील. या आचार संहितेस अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, निवडणूक आचार संहितेच्या प्रस्तुत कालावधीमध्ये महाराष्ट्र राज्यातील मतदार प्रभावित होतील असे कोणत्याही प्रकारचे धोरणात्मक निर्णय घेण्यात येऊ नयेत.

तसेच आपणास विनंती आहे की, भारत निवडणूक आयोगाचे हे आदेश आपल्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख तसेच आपल्या विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील महामंडळे, सार्वजनिक उपक्रम इत्यादींच्या कटाक्षाने निदर्शनास आणण्यासंबंधी आपण योग्य ती कार्यवाही करावी. तसेच सर्व विभागीय आयुक्त व सर्व जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, यांना विनंती आहे की, भारत निवडणूक आयोगाचे प्रस्तुत आदेश आपल्या जिल्हयातील केंद्र शासनाच्या सर्व कार्यालय प्रमुखांच्या निदर्शनास आणण्यासंबंधी त्यांनी कृपया योग्य ती कार्यवाही तात्काळ करावी.

आपला,

दे. चक्रबर्ती.

( देबाशीष चक्रबर्ती )
सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी
महाराष्ट्र राज्य

SO Bandpatte correspondence A.L.P.